६, सत्यवादी ता. १६/१/१९९० पान

### शिक्षणमहर्षी

# श्री. व्हो. टी. पाटील यांचा उद्या सत्कार



कोल्हापूर; ता. १५– ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक, शिक्षण-महर्षी श्री. व्हो. टी. पाटील तथा काकाजी यांच्या नवती महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त सामाजिक; शैक्षणिक, सहकार व सांस्कृतिक क्षेत्रातील थोर सेवेचा गौरव समारंभ शिक्षणमहर्षी मान. श्री व्हो. टी. पाटील नवती महोत्सव नागरी सत्कार समितीच्यावतीने बुधवार ता १७ जानेवारी रोजी स. ९ वा. आयोजित करण्यात आला आहे.

ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात होणाऱ्या या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून थोर विचारवंत यशवंतराव मोहिते हे उपस्थित राहणार आहेत.